**<u>ठळक बातम्या</u>**

- जर्मनीशी मैत्री आणि भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं जर्मनीच्या चान्सलरसोबतच्या द्विपक्षीय चर्चेनंतर प्रधानमंत्र्यांचं संयुक्त पत्रकार परिषदेत प्रतिपादन

- आयपॅक कंपनीवर टाकलेल्या छाप्यात अडथळे आणल्याचा आरोप करत ईडीची ममता बॅनर्जीविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव

- स्वामी विवेकानंद यांच्या  जयंतीदिनी देशभरातून आदरांजली

**आणि**

- मलेशिया आणि इंडोनेशिया या देशांकडून ग्रोक या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित चॅट बॉट वर बंदी

**<><><><><>**

भारत जर्मनीशी मैत्री आणि भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहे, असं प्रतिपादन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज अहमदाबाद इथे जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्यासह संयुक्त निवेदनात बोलत होते. भारत आणि जर्मनीने आपल्या धोरणात्मक भागीदारीची २५ वर्षं पूर्ण केली असून यंदा दोन्ही देशांच्या राजनैतिक संबंधांना ७५ वर्षं पूर्ण होत आहेत. हे टप्पे सामायिक महत्त्वाकांक्षा, परस्पर विश्वास आणि सहकार्याला सातत्याने बळकटी देणारे आहेत, असंही मोदी म्हणाले. भारत आणि जर्मनीसारख्या प्रमुख अर्थव्यवस्थांमधल्या सहकार्याविषयी मोदी म्हणाले...

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री**

तत्पूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्यात आज गुजरातमध्ये गांधीनगर इथल्या महात्मा मंदिरात बैठक झाली. मर्झ यांचा हा पहिलाच दौरा असून विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. यावेळी गेल्या २५ वर्षांत भारत-जर्मनीदरम्यानच्या धोरणात्मक भागीदारीमध्ये झालेल्या प्रगतीचा आढावाही घेण्यात आला. तत्पूर्वी प्रधानमंत्री मोदी आणि चान्सलर मर्झ यांनी साबरमती

आश्रमात महात्मा गांधींना अभिवादन केलं तसंच महात्मा गांधीचं निवासस्थान असलेल्या हृदयकुंज इथं भेट देऊन चरख्यातून सूत कातण्याची प्रक्रियाही पाहिली. तसंच, अहमदाबादमध्ये साबरमती रिव्हरफ्रंट येथे आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सवातही भाग घेतला.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये कोळसा घोटाळ्याच्या संदर्भात आयपॅक कंपनीवर टाकलेल्या छाप्यात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह राज्य सरकारनं हस्तक्षेप केल्याचा तसंच अडथळे आणल्याचा आरोप करत ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी छापे टाकलेल्या ठिकाणांवर प्रवेश करून आयपॅक कंपनी परिसरातून दस्तऐवज आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांसह महत्त्वाचे पुरावे ताब्यात घेतल्याचा आरोप ईडीने आपल्या याचिकेत केला आहे. आयपॅक ही कंपनी राजकीय सल्लागार म्हणून काम करते. या कंपनीवर ईडीने केलेल्या छाप्यासंदर्भात सुनावणीशिवाय कोणताही आदेश देऊ नये अशी मागणी करणारा कॅव्हेट पश्चिम बंगाल सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. तसंच, छापेमारीच्या कारवाईत सहभागी झालेले ईडी कर्मचारी तसंच सीआरपीएफ जवानांची नावं आणि तपशील मिळवण्यासाठी पश्चिम बंगाल पोलिसांनी ईडीशी संपर्क साधण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

विकसनशील देशांच्या विकास उद्दिष्टांना खीळ न बसता त्यांच्या हरित ऊर्जा उत्पादनांची क्षमता वाढण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची गरज असल्याचं केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. आंतरराष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा संस्थेच्या अबू धाबी इथे आयोजित १६ व्या सभेत ते काल बोलत होते.

हरित ऊर्जेची निर्मिती आणि साठवण, हरित हायड्रोजन, ग्रीड इत्यादींसाठी येत्या २०३० सालापर्यंत भारतालाच ३ अब्ज अमेरिकन डॉलर्सची गरज पडणार आहे असं ते म्हणले. प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजने अंतर्गत गेल्या दोन वर्षात भारतभरात अडीच कोटी घरांच्या छतांवर सौर पॅनल्स लागली आहेत. तसंच सुमारे २ कोटी शेतकऱ्यांच्या डिझेलवर चालणाऱ्या कृषी यंत्रांना सौर उर्जेवर चालवण्यासाठी पीएम कुसुम योजना कार्यरत आहे असं ते म्हणाले.

<><><><><>

तामिळनाडूमधल्या करूर इथं झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी चौकशीसाठी टीव्हीके अर्थात तमिळगा वेत्री कळघम पक्षाचे नेते विजय  नवी दिल्लीत सीबीआयच्या मुख्यालयात पोहोचले. गेल्यावर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या या चेंगराचेंगरीत ४१ जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

इसरोने श्रीहरीकोटा मधल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून आज सकाळी पीएसएलव्ही सी ६२ या अंतराळयानाद्वारे  केलेल्या इओएस एन १ अर्थात पृथ्वी निरीक्षण उपग्रह आणि इतर १४ व्यावसायिक उपग्रहाच्या प्रक्षेपणाच्या तिसऱ्या टप्प्यात यानाच्या मार्गात काही अनपेक्षित बदल दिसून आल्याचं इसरो चे अध्यक्ष डॉ व्ही नारायणन यांनी म्हटलं आहे.  प्रक्षेपणातले दोन टप्पे यशस्वीपणे पार पडले, परंतु तिसऱ्या टप्प्याच्या शेवटी यानाच्या स्वतःभोवती फिरण्याच्या वेगात बदल दिसून आला.  यासंबंधात इसरो ला यानाकडून मिळालेल्या माहितीचं विश्लेषण सुरु असल्याचं नारायणन यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

स्वामी विवेकानंद यांच्या  जयंतीदिनी आज देश त्यांना आदरांजली वाहत आहे. विवेकनंदांचा जयंती दिवस राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली आहे. भारतीय संस्कृतीने दिलेलं शाश्वत ज्ञान जगापर्यंत पोचवण्याचं महत्वाचं काम स्वामीजींनी केलं असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनीही स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांचं पुण्यस्मरण केलं आहे. स्वामी विवेकानंदांच्या जीवन आणि शिकवणीतून स्वयंशिस्त, निस्वार्थ सेवाभाव आणि अंतर्मनाची शक्ती वाढवण्यासाठी सर्वांना प्रेरणा मिळत आहे, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय युवा दिनानिमित्त स्वामीजींच्या चरित्रातून देशवासियांना आणि विशेषतः तरुणांना नवीन शक्ती आणि आत्मविश्वासाची प्रेरणा मिळेल असं आपल्या  संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि इतर मान्यवरांनीही स्वामी विवेकानंदांना आदरांजली वाहिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाबाई यांचीही जयंती आज देशभरात साजरी होत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांना अभिवादन केलं आहे.

<><><><><>

मलेशिया आणि इंडोनेशिया या देशांनी ग्रोक या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित चॅट बॉट वर बंदी घातली आहे. एलोन मस्क यांच्या एक्स ए आय कंपनीने तयार केलेल्या या चॅट बॉट चा वापर अश्लील छायाचित्र, चित्रफिती आणि इतर अश्लील आशयनिर्मितीसाठी होत असल्यामुळे हे पाऊल उचलल्याचं अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. डिजिटल विश्वात कार्यरत नागरिकांच्या सुरक्षितता आणि मानवाधिकारांचं यातून उल्लंघन होत असल्याचं इंडोनेशियाचे डिजिटल व्यवहार मंत्री मेतुया हफीद यांनी म्हटलंय. ग्रोकचा गैरवापर केला जाऊ नये म्हणून अनेक प्रतिबंधात्मक उपायांची योजना केली जाणार आहे, तोपर्यंत ही बंदी कायम राहील असं दोन्ही देशांनी म्हटलं आहे.

<><><><><>

जागतिक पातळीवर आपल्या शक्तीवर फक्त आपल्याच नैतिकतेचं बंधन आहे, आंतरराष्ट्रीय कायद्याचं आपल्या कारवायांवर काहीही नियंत्रण नाही, असं मत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलं. गेल्या आठवड्यात एका वृत्तपत्राला त्यांनी मुलाखत दिली, त्या मुलाखतीची लिखित प्रत काल प्रसिद्ध झाली. अमेरिकेच्या सुरक्षेला धोका आहे, असं जर ट्रम्प यांना वाटत असेल, तर अशा वेळी त्यांना थांबवू शकेल, अशी एखादी गोष्ट आहे का, असं त्यांना विचारलं असता, फक्त आपली नैतिकता आणि आपले विचार आपल्याला थांबवू शकतात, असं ट्रम्प यांनी सांगितलं.

<><><><><>

कच्च्या तेलाचा भाव आज ८ रुपयांनी घसरून ५ हजार ३५८ रुपये प्रति बॅरल झाला. जागतिक बाजारात होणाऱ्या अतिरिक्त पुरवठ्यामुळे किमतीवर परिणाम झाला आहे.

<><><><><>

झारखंडमधल्या गरहवा इथं ट्रकने कारला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. बेल चंपा परिसरात काल रात्री उशीरा हा अपघात झाला. मृत पलामु जिल्ह्यातले रहिवासी होते. बिलासपूर इथून लग्न समारंभ आटोपून ते परतत असताना हा अपघात झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना यूपी वॉरियर्सशी होणार आहे. नवी मुंबईत डॉ. डी. वाय. पाटील मैदानावर आज संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. हा या स्पर्धेचा पाचवा सामना आहे. पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने मुंबई इंडियन्सवर ३ गडी राखून विजय मिळवला होता. तर गेल्या शनिवारी झालेल्या सामन्यात यूपी वॉरियर्सला गुजरात जाएंट्स विरुद्ध १० धावांनी पराभव पत्करावा लागला होता.

**//<><><><><>//**